MHPU190013492025

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | ०३.०६.२०२१ |
| नोंदणी दिनांक | ०३.०६.२०२१ |
| निकाल दिनांक | १२.०१.२०२६ |
| कालावधी | वर्ष महिने दिवस |
| | ०४ ०७ ०९ |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे यांचे न्यायालय**

**(पिठासीन अधिकारी सुनिल श. दहातोंडे यांचे समक्ष)**

संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १२९८/२०२५ निशाणी क्र.१५

(जुना संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४३५/२०२१)

**आरोपीचे प्रतिकथन**

| | | |
|---|---|---|
| १. गुन्हा घडल्याचा दिनांक | – | १५.०७.२०१९ |
| २. गुन्हा दाखल दिनांक | – | १५.०७.२०१९ |
| ३. फिर्यादीचे नाव | – | महाराष्ट्र शासन, तर्फे पोलीस ठाणे यवत, ता. दौंड, पुणे. |
| ४. आरोपीचे नाव | – | ४. तानाजी शिवराम गायकवाड,<br>वय – ५४ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>राहणारः पाटस, अंबिका नगर, ता. दौंड, जि. पुणे. |

५. गुन्ह्याचा तपशीलः दिनांक १५.०७.२०१९ रोजी दुपारी ०३.४५ वाजण्याच्या सुमारास मौजे पाटस, ता. दौंड, जि. पुणे गावचे हद्दीत बाजरतळाचे खालचे बाजुस ओढ्याचे कडेला काटवनात तुम्ही आरोपी क्र.४ यांनी इतर आरोपीसोबत सार्वजनिक ठिकाणी 'कल्याण मटका' नावाचा जुगार चालवित असतांना मिळून आले आणि तुमच्या ताब्यातुन रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असे एकुण रुपये २४,५६०/– ऐवज मिळून आला आणि त्याद्वारे तुम्ही **मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ)** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे.

Digitally signed by SUNIL SHARAD DAHATONDE
Date: 2026.01.13 15:08:10 +0530

स्थळः दौंड

दिनांकः १२.०१.२०२६.

**(सुनिल श. दहातोंडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

## <u>आरोपीचे प्रतिकथन</u>

प्रश्न क्र. १– तुम्ही तक्रारीच्या प्रती स्वीकारल्या का ?

उत्तर — होय.

प्रश्न क्र. २– तुम्हाला तुमच्या भाषेत वाचुन व समजुन सांगितलेला गुन्हायाचा तपशील समजला का ?

उत्तर – होय.

प्रश्न क्र. ३– तुम्हाला गुन्हा कबुल आहे का ?

उत्तर – हो, गुन्हा कबुल आहे.

_____________

आरोपी क्र.४ ची सही

समक्ष

Digitally signed by SUNIL SHARAD DAHATONDE
Date: 2026.01.13 15:08:17 +0530

स्थळः दौंड

**(सुनिल श. दहातोंडे)**

दिनांकः १२.०१.२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

## <u>आदेश निशाणी १ खाली</u>

आरोपी क्र.४ तानाजी शिवराम गायकवाड आजरोजी दिनांक १२.०१.२०२६ रोजी न्यायालयात हजर झाले. आरोपी क्र.४ ने स्वेच्छेने गुन्हा कबुल करत असल्याबाबतचा निशाणी क्र.१४ वर पुरसिस दाखल केली आहे. तसेच, जप्त मुद्देमालाशी आरोपीचा काहीही संबंध नसल्याचे नमुद केले आहे. आरोपीच्या विरुद्ध **मुंबई जुगार कायदा कलम १२(अ)** अन्वये प्रकरण दाखल आहे. आरोपी क्र.४ ने गुन्हा कबुल केल्यामुळे होणा–या परिणामांची कल्पना त्याला देण्यात आली आहे. तरीही आरोपी क्र.४ हा गुन्हा कबुल करत आहेत. यावरुन हे स्पष्ट होते की, आरोपी क्र.४ यांनी स्वेच्छेने गुन्हा कबुल व मान्य केला आहे. शिक्षेविषयी आरोपी क्र.४ चे व आरोपीचे विधिज्ञ यांचे म्हणणे ऐकले. आरोपी क्र.४ ने सांगितले की, तो सराईत गुन्हेगार नसुन त्याचा हा प्रथम गुन्हा आहे आणि सदर गुन्ह्यासाठी त्याला पश्चाताप होत आहे, त्यामुळे त्याला कमीत कमी शिक्षा द्यावी अशी विनंती केली आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद श्रवण केला. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, आरोपीने गुन्हा मान्य केल्यामुळे त्याला कायद्याप्रमाणे जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी. आरोपी क्र.४ ला सदर गुन्ह्याचा पश्चाताप झालेला आहे आणि त्याने स्वतःहुन प्रामाणिकपणे गुन्ह्याची कबुली दिली आहे. या सर्व कारणांचा

विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र.४ तानाजी शिवराम गायकवाड यांचे **फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२** अन्वये **मुंबई जुगार कायदा कलम १२(अ)** प्रमाणे गुन्ह्यासाठी दोषी ठरवुन त्याला न्यायालय उठे पर्यंत शिक्षा व रक्कम रुपये ३००/- (अक्षरी तीनशे फक्त) दंड द्रव्याची शिक्षा सुनावण्यात येत आहे व सदरची दंड द्रव्याची रक्कम न भरल्यास दोन दिवस साधी कैद अशी शिक्षा सुनावण्यात येत आहे.

२. **जप्त मुद्देमाल–**

अ) प्रस्तुत प्रकरणात आरोपी क्र.५ विरुध्द खटला प्रलंबित असल्यामुळे मुद्देमालाच्या विल्हेवाटीबाबत कुठलेही आदेश पारित करण्यात येत नाही.

ब) आरोपी तानाजी शिवराम गायकवाड यांच्याकडुन जप्त करण्यात आलेली रोख रक्कम रुपये ७,२००/- (अक्षरी रुपये सात हजार दोनशे फक्त) अपील कालावधी नंतर सरकार जमा करण्यात यावी.

३. आदेशाची प्रत आरोपीस तात्काळ व मोफत देण्यात यावी.

Digitally signed by SUNIL SHARAD DAHATONDE
Date: 2026.01.13 15:08:23 +0530

स्थळः दौंड

दिनांकः १२.०१.२०२६.

**(सुनिल श. दहातोंडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

## :: CERTIFICATE ::

I affirm that the contents of this P. D. F. file of order are word to word, as per its original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | M. C. Atnure |
| Name of Court | : | Sunil S. Dahatonde,<br>J.M.F.C., Railway Court, Daund. |
| Decided on | : | 12.01.2026 |
| Signed on | : | 12.01.2026 |
| Uploaded on | : | 12.01.2026 |